नियमित फौ. ख. क्र. ५१/२०२३
सरकार -वि.- बबन व इतर
नि.क्र. २७.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - नंदु देवराव पाल,
वय ४७ वर्षे, व्यवसाय – दुकान,
राहणार – पुल्लर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री व्ही.यू.मिरचे यांचे मार्फत</u>**

१. दिनांक २१.०६.२०२३ रोजी पोलिसांनी मला दुकानावर बोलविले होते. तिथे भांडण झालेले होते. पोलिसांनी माझ्या समक्ष कुठलीही कारवाई केली नाही. पोलिसांनी माझ्या समक्ष काही जप्त केले नाही. पोलिसांनी मला सह्या करण्यास सांगितले म्हणूण मी सही केली. आता मला दाखविलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहीत नाही. सहीला **नि.क्र.२८** देण्यात येते. आता मला दाखविलेला जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहीत नाही. सहीला **नि.क्र.२९** देण्यात येते. आता मला दाखविलेल्या आर्टिकल 'अ व ब' वरील जप्त काठ्या त्याच आहेत. पोलिसांनी माझे बयाण घेतले नव्हते. मी आरोपींना ओळखतो.

सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २१.०६.२०२३ रोजी ३ ते ४ वाजताच्या दरम्यान पोलिसांनी मला कोल्हे याच्या पानठेल्यावर सिमेंट रोडवर बोलविले होते. हे म्हणणे खरे आहे की, कोल्हे याच्या पानठेल्याच्या बाजुला माझा पानठेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तिथे घटनास्थळाचा पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला तो पंचनामा वाचून दाखविला व माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या समक्ष दोन काठ्या जप्त केल्या होत्या व तसा जप्ती पंचनामा तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला तो पंचनामा वाचून दाखविला व माझी सही घेतली. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १७.०६.२०२३ रोजी माझ्या दुकानासमोर मारहाणची घटना घडली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी अमोल कोल्हेला ओळखतो. तो पंचनाम्याच्यावेळी हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, आर्टिकल 'अ व ब' वरील काठ्या माझ्या समक्ष जप्त केल्या होत्या.

**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत**

३. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला पंचनाम्याकरिता हजर राहण्याचा नोटीस दिला नव्हता.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक – २६.०८.२०२५

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.